महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : एलटीडी-३४१७/सीआर-१४/२०१७/जाहिरात जाहिरात क्रमांक : ०८६/२०२२

# सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २०२२

मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक संवर्गातील कर्मचा-यांना सहायक कक्ष अधिकारी पदावर निवडीद्वारे नियुक्ती देण्यासाठी **महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शनिवार, दिनांक १० डिसेंबर, २०२२** रोजी सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २०२२ फक्त **मुंबई** येथे आयोजित करण्यात येईल.

२. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व आयोगाच्या कार्यालयातील पदांचा व इतर तपशील खालीलप्रमाणे आहे :-

**२.१** वेतनश्रेणी :- S-१४ : ३८६००-१२२८००

**२.२** पदसंख्या

**(१) मंत्रालयीन विभाग — एकूण ६२ पदे** (एकूण पदांपैकी ०२ पदे दिव्यांग व्यक्तींकरीता आरक्षित आहेत)
(एक) १ पद - अंध व अल्पदृष्टी व
(दोन) १ पद- विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness) तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व

**(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय - ०४ पदे**

**२.३** वर नमूद पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२.४ मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून गुणवत्तेनुसार पदे भरण्यात येतील.

**३. पात्रता :-**

**३.१** फक्त मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या खुद्द आस्थापनेवरील तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील कार्यरत लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक संवर्गातील कर्मचारी प्रस्तुत परीक्षेस अर्ज करण्यासाठी पात्र आहेत. **मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील कोणत्याही दुय्यम कार्यालयातील कर्मचारी प्रस्तुत परीक्षेकरीता अर्ज करण्यास पात्र नाहीत.**

**३.२** जाहिरातीस अनुसरून निश्चित करण्यात आलेल्या **अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास** लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक संवर्गामध्ये नियमित सेवेची किमान **पाच** वर्षे सेवा पूर्ण झालेले कर्मचारी प्रस्तुत परीक्षेकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत.

**३.३** नियमित सेवेचा कालावधी खालीलप्रमाणे गणण्यांत येईल :-
(१) **आयोगामार्फत नामनिर्देशनाने नेमणूक झालेले कर्मचारी :-** नियमित नियुक्तीच्या दिनांकापासून
(२) **अनुकंपा तत्वावर नेमणूक झालेले कर्मचारी :-** नियुक्तीच्या दिनांकापासून
(३) **पदोन्नत कर्मचारी :-** सेवाप्रवेश नियमातील गुणावत्तेनुसार नियमित पदोन्नतीच्या दिनांकापासून
(४) **अन्य कारणास्तव सेवा नियमित झालेले कर्मचारी:-** सेवा नियमित केल्यासंबंधीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशाच्या दिनांकापासून

**३.४** कोणत्याही परिस्थितीत लिपिक, लिपिक-टंकलेखक अथवा टंकलेखक संवर्गातील पदावरील अभावित नियुक्तीचा कालावधी पात्रतेसाठी गणण्यात येणार नाही.

**३.५** लिपिकवर्गीय कर्मचा-यांसाठी असलेली सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण न झालेले अथवा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिलेली नाही, तसेच स्थायित्व प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही असे कर्मचारी प्रस्तुत परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असणार नाहीत.

**४. आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

**४.१ दिव्यांग आरक्षण :-**

**४.१.१** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**४.१.२** प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या सहायक कक्ष अधिकारी संवर्गाकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:कअस-१३१९/ प्र.क्र.७४/१४-ब, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे दिव्यांग व्यक्तींसाठी सुनिश्चिती करण्यात आली आहेत :-

(1) B, LV
(2) D, HH,
(3) OA, BA, OL, BL, OAL, CP, LC, DW, AAV,
(4) SLD, MI
(5) MD involving (1) to (4) above

**४.१.३** दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनानाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**४.१.४** संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

**४.१.५** लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील:-
(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती.
(२) दिव्यांगत्याचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी-सवलती

**४.१.६** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.